महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
आवक क्रमांक १९७७
दिनांक : ०८. १२. २०१५

ANNEX - II

# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव (टंचाई शाखा)

*****************************************************************************************

दुरध्वनी क्र. ०२५७-२२२३१८१ E-mail scy.jalgaon@gmail.com

*****************************************************************************************

क्र. म. शा. टंचाई-२/ (२०१५/७/५०/२६८० दि. ०२/१२/२०१५

प्रति,

मा. अध्यक्ष,
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,
९ वा मजला, सेंटर - १, वर्ल्ड ट्रेड सेंटर,
कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

विषय:- केस नं. ८ सन-२०१५
नाशिक जिल्ह्यातील गिरणा धरणाच्या वरील बाजूचे चणकापूर, हरणबारी, केळझर व पुनंद धरणातून गिरणा धरणात पाणी सोडणे बाबत.....

प्रतिवादी- जिल्हाधिकारी, जळगांव
श्री. उन्मेश पाटील आमदार चाळीसगांव
कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव.

गिरणा परिसरात सन २०१५-१६ मध्ये ऑक्टोबर अखेर फक्त ५२८ मि. मी. पाऊस झालेला आहे. सदर पाऊस सरासरी पर्जन्य मानाच्या तुलनेने खुप कमी आहे. सन- २०१५ मधील कमी पर्जन्यमानामुळे गिरणा धरणात या वर्षी १५ ऑक्टोबर २०१५ रोजी फक्त ५६. ६१ दलघमी (१९९९ दलघफू) म्हणजेच १०.८१ % उपयुक्त पाणी साठा उपलब्ध झालेला होता. मागील वर्षी याच तारखेस २४५.५३ दलघमी (८६७१ दलघफू) म्हणजेच ४६.९० % उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध होता.

मागील वर्षी उपयुक्त पाणी साठा पुरेसा असल्याने मालेगाव महानगरपालिकेसाठी ५२५ दलघफू बिगरसिंचन पाणी आरक्षण करण्यात आलेले होते. मालेगाव महानगरपालिकेने सन २०१५-१६ मध्ये ८०० दलघफू पाणी आरक्षणाची मागणी केलेली आहे. तथापि, यावर्षी (सन २०१५-१६) उपयुक्त साठा फारच कमी असल्याने मा. पालकमंत्री, जळगांव यांचे अध्यक्षतेखाली दि.

०४/११/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत मालेगांव महानगरपालिकेसाठी १५० दलघफू पाणी आरक्षण केलेले आहे. उर्वरीत पाण्याची मागणी चणकापूर प्रकल्पावरुन घेणे अपेक्षित आहे.

चणकापूर व पुनंद प्रकल्पावर गेल्या वर्षाच्या तुलनेत बिगरसिंचन आरक्षणात सन २०१५-१६ मध्ये वाढ झालेली असल्याचे आढळून येते. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | वर्षनिहाय आरक्षण (दलघफू) | | वाढ |
|---|---|---|---|---|
| | | २०१४-१५ | २०१५-१६ | |
| १ | चणकापूर | १९९१ | २४०५ | ४१४ |
| २ | पुनंद | ५२१ | ११४० | ६१९ |
| ३ | हरणबारी | ३३० | १०७० | ७४० |
| ४ | केळझर | ९० | २८० | १९० |
| | | | **एकूण** | १९६३ |

गिरणा प्रकल्पातून उपलब्ध पाणी साठ्यानुसार रब्बी व उन्हाळी हंगामात साधारणतः ५ ते ७ आवर्तने चाळीसगाव, पाचोरा, भडगाव नगरपालिकेसाठी व १६७ पाणी पुरवठा योजना (२८५ गावे) साठी सोडण्यात येतात. सोबत सन २०११-१२ ते २०१४-१५ मध्ये देण्यात आलेल्या आवर्तनांचा व सन २०१५-१६ मध्ये प्रस्तावित आवर्तनांचा तक्ता सोबत जोडलेला आहे.

गिरणा धरणात अत्यल्प पाणी साठा असल्यामुळे २ १/२ महिन्याच्या कालावधी नंतर आवर्तन देण्याचे प्रस्तावित आहे. फेब्रुवारी-२०१६ मध्ये दुसरे आवर्तन सोडल्यानंतर गिरणा धरणात पाणीसाठा शिल्लक राहणार नाही. त्यामुळे एप्रिल ते जुलै अखेरच्या कालावधीपर्यंत गिरणा परिसरात भीषण पाणी टंचाई निर्माण होणार आहे. अशा परिस्थितीत वरील धरणांमधून पाणी सोडण्याशिवाय पर्याय नाही. त्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सन २०१५-१६ मध्ये चणकापूर धरणातून ५ बिगरसिंचन आवर्तने ४०-४२ दिवसांच्या अंतराने प्रस्तावित केलेली आहेत. सदरच्या आवर्तनाचा कालावधी साधारणतः ६०-६५ दिवसांचा केल्यास दोन आवर्तने कमी होतील व दोन आवर्तनांचे पाणी वाचू शकेल.

सटाणा शहर पाणी पुरवठा योजनेसाठी यावर्षी चणकापूर धरणातून ८० दलघफू व पुनंद प्रकल्पातून २०० दलघफू असे एकूण २८० दलघफू पाणी आरक्षण करण्यात आलेले आहे. सटाणा पाणी पुरवठा योजनेच्या साठवण तलावाची क्षमता कमी असल्याचे समजते.

सदर तलावाची साठवण क्षमता वाढविल्यास आवर्तने कमी होतील व त्यामुळे पाणी वापर कमी होवून पाणी बचत होईल.

या व्यतिरिक्त पुनंद धरणातून दोन योजनांसाठी कालवा व नदीमार्गे ३५० दलघफूची दोन आवर्तने सोडण्यात येणार आहे व २४० दलघफू आवर्तन कालव्याद्वारे ५ योजनांसाठी पाणी आरक्षण आहे. सदर आरक्षणामध्ये कपात केल्यास गिरणा धरणामध्ये सोडण्यासाठी पाणी साठा उपलब्ध होऊ शकेल.

गिरणा प्रकल्पावरील पाणी पुरवठा योजनेअंतर्गत मालेगाव महानगरपालिकेच्या भागासाठी चणकापूर धरणावरुन पाणी पुरवठा करणे शक्य नसल्याचे समजते. सदर भागाला पाणी पुरवठा करावयाचा झाल्यास गिरणा धरणात मालेगाव महानगरपालिकेसाठी मागील वर्षाप्रमाणे ५२५ दलघफू आरक्षण आवश्यक आहे.

चणकापूर धरणातून मालेगाव महानगरपालिकेसाठी सोडण्यात येणाऱ्या आवर्तनासोबत चणकापूर व पुनंद धरणातून एकाच वेळेस १६०० दलघफू पाणी सोडल्यास वहनव्यय कमी होवून गिरणा धरणात पाणी साठा होवू शकेल, असे गिरणा प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले व मालेगाव महानगरपालिकेसाठी मागणी प्रमाणे ५०० दलघफू पाणी पुरवठा करणे शक्य होइल.

Strategy-१ चे पालन करावे, ही विनंती. टंचाईच्या Norms प्रमाणे ग्रामीण भागासाठी २० लिटर प्रति माणसी प्रति दिन व शहरी भागासाठी ५० लिटर प्रति माणसी प्रति दिन प्रमाणे आकडेमोड सोबत सादर करण्यात येत आहे. तसेच यामध्ये फक्त लोकसंख्येचा विचार केलेला आहे. जळगांव जिल्ह्यात जवळपास ८ लक्ष पशुधन आहे. त्याचा सुद्धा विचार मा. अध्यक्षांनी करावा, ही विनंती.

जळगांव जिल्ह्यासाठी दरवर्षी ५ ते ७ आवर्तने सोडण्यात येतात पण यावर्षी फक्त दोन आवर्तने प्रस्तावित असून ६० % कपात केलेली आहे. फक्त एप्रिल पर्यंतचे नियोजन असून एप्रिल-२०१६ नंतर भीषण पाणी टंचाई निर्माण होणार आहे. नाशिक जिल्ह्यासाठी जुलै-२०१६ पर्यंत चे नियोजन मोघम स्वरुपाचे केलेले असल्याचे दिसते, त्याची तपासणी होणेस विनंती आहे.

पाणी वापर संस्थांचा पाणी वापर एकाच स्त्रोतातून करणे नैसर्गिकदृष्ट्या योग्य आहे. नांदगाव व ५६ खेडी, दहिवाळ व २५ गावे या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना मागणी प्रमाणे आरक्षण केले आहे. फक्त मालेगाव शहराला चणकापूर व गिरणा धरणातून स्त्रोत असल्यामुळे गिरणा धरणातून आरक्षण कमी केलेले आहे. सोबत जळगांव जिल्ह्याचे आरक्षणाचे इतिवृत्त आरक्षणाची प्रत सोबत सादर करण्यात येत आहे.

तसेच पाचोरा, भडगाव शहराला १० दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत असून मालेगाव शहराला एक दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. त्यातही काटकसरीचे नियोजन करणे आवश्यक आहे.

पुनंद, चणकापूर, हरणबारी व केळझर या प्रकल्पातून Strategy-१ प्रमाणे पाणी सोडले तर भविष्यात जळगांव जिल्ह्यासाठी तिसरे आवर्तन मिळू शकेल; जेणेकरुन जुलै-२०१६ पर्यंत टंचाई भासणार नाही आणि मालेगाव व इतर योजनांना सुध्दा त्यांच्या मागणीप्रमाणे आरक्षण उपलब्ध होईल. तरी Strategy-१ प्रमाणे पाणी सोडणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

जिल्हाधिकारी, जळगांव.

| गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सन २०११-१२ ते सन २०१४-१५ या कालावधीतील गिरणा प्रकल्पावरील आवर्तनांचा तपशील | | | | | | | | | | | |
| प्रकल्पीय उपयुक्त साठा- १८५०० दलघफू / मृत साठा- ३००० दलघफू / एकूण साठा - २१५०० दलघफू | | | | | | | | | | | |
| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव/वर्ष | दि. १५/१० चा उपयुक्त साठा (दलघफू) | टक्केवारी | बिगरसिंचन आरक्षण (दलघफू) | | | आवर्तन निहाय तपशील (दलघफू) | | | | |
| | | | | | | | सिंचन | | बिगरसिंचन | | |
| | | | | जलाशय | नदी | एकूण | आवर्तन कालावधी | झालेला पाणी वापर | आवर्तन कालावधी | झालेला पाणी वापर | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | गिरणा मोठे प्रकल्प २०११-१२ | ७२९० | ३९.४१ | ३२४.०० | १८४९.६० | २१७३.६० | --- | --- | १५/११ ते १७/११/११ | २४८ | |
| | | | | | | | --- | --- | २०/१२ ते २२/१२/११ | १९६ | |
| | | | | | | | --- | --- | २६/१ ते ३१/१/१२ | ४४६ | |
| | | | | | | | --- | --- | २९/२ ते ५/३/१२ | ४६४ | |
| | | | | | | | --- | --- | ३०/३ ते ४/४/१२ | ५६७ | |
| | | | | | | | --- | --- | २८/४ ते ३/५/१२ | ५७२ | |
| | | | | | | | --- | --- | २६/५ ते ६/६/१२ | १०९८ | |
| एकूण | | ७२९० | ३९.४१ | ३२४ | १८४९.६० | २१७३.६० | | | | ३५९१ | |
| २ | गिरणा मोठे प्रकल्प २०१२-१३ | ३०८८ | १६.६९ | ३२०.०० | १३३२.१० | १६५२.१० | --- | --- | १०/७ ते १३/७/१२ | २३४ | |
| | | | | | | | --- | --- | १७/८ ते २१/८/१२ | ११७ | |
| | | | | | | | --- | --- | ३०/१० ते ०४/११/१२ | ५३८ | |
| | | | | | | | --- | --- | २०/१२ ते २२/१२/१२ | १५१ | |
| | | | | | | | --- | --- | २६/१ ते ३१/१/१३ | ७१५ | |
| | | | | | | | --- | --- | १५/४ ते २२/४/१२ | ८६२ | |
| | | | | | | | --- | --- | ३०/६ ते १/७/१३ | १५८ | |
| एकूण | | ३०८८ | १६.६९ | ३२० | १३३२.१० | १६५२.१० | | | | २७७५ | |

| प्रकल्पीय उपयुक्त साठा – १८५०० दलघफू / मृत साठा – ३००० दलघफू / एकूण साठा – २१५०० दलघफू | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बिगरसिंचन आरक्षण (दलघफू) | | | आवर्तन निहाय तपशील (दलघफू) | | | | |
| | | | | | | | सिंचन | | बिगरसिंचन | | |
| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव/वर्ष | दि. १५/१० चा उपयुक्त साठा (दलघफू) | टक्केवारी | जलाशय | नदी | एकूण | आवर्तन कालावधी | झालेला पाणी वापर | आवर्तन कालावधी | झालेला पाणी वापर | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ३ | २०१३-१४ | ८१६९ | ४४.१६ | ६०९.०० | ११३७.१० | १७४६.१० | ३०/१२ ते १८/१/१४ | १७९८ | ३/४ ते ७/४/१४ | ५६२ | |
| | | | | | | | १८/१ ते २/२/१४ | ७८८ | २१/५ ते २८/५/१४ | ८१५ | |
| | | | | | | | --- | --- | २२/७ ते २५/७/१४ | ४१० | |
| **एकूण** | | ८१६९ | ४४.१६ | ६०९.०० | ११३७.१० | १७४६.१० | | २५८६ | | १७८७ | |
| ४ | २०१४-१५ | ८६७६ | ४६.९० | ८०१.०० | १०२७.१० | १८२८.१० | २७/११ ते १२/१२/१४ | १५८३ | २१/१० ते २२/१०/१४ | १३० | |
| | | | | | | | १६/१ ते ३/२/१५ | १५९७ | २१/३ ते २५/३/१५ | ५५४ | |
| | | | | | | | --- | --- | ७/५ ते १३/५/१५ | ८६४ | |
| | | | | | | | --- | --- | ३०/७ ते ५/८/१५ | ७६७ | |
| **एकूण** | | ८६७६ | ४६.९० | ८०१.०० | १०२७.१० | १८२८.१० | | ३१८० | | २३१५ | |
| ५ | २०१५-१६ | १९९९ | १०.८० | ४२६.०० | १५४०.६५ | १९६६.६५ | --- | --- | २५/११ ते ३०/११/१५ | ६५० | दिले |
| | | | | | | | --- | --- | २०/२ ते २५/२/१६ | ७०० | |
| **एकूण** | | १९९९ | १०.८० | ४२६.०० | १५४०.६५ | १९६६.६५ | | ३१८० | | १३५० | |

Annex III

वाचले : -१) शासनाचे पाटबंधारे विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण / १००३ / (३१०/०३) सिंव्य (धो) दि. १० / ०८ / २०१४

२) शासनाचे महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१५ / प्र. क्र. २९०/म -७ दि. ०७/०९/२०१५

३) मा. पालकमंत्री नाशिक जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली दि. २१/११/२०१५ रोजी झालेली बैठक

.....................................................................................................................

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक
क्र. कक्ष/१३/२/टंचाई/७/२५/१८५३/१५
नाशिक दि. ३०/११/२०१५

**आदेश**

नाशिक जिल्ह्यातील मोठे व मध्यम प्रकल्पातील पाणी सन २०१५-१६ वर्षाकरिता सोबतच्या विवरणपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे पाणी आरक्षीत करण्याच्या प्रस्तावास मा. पालकमंत्री नाशिक जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली दि. २१/११/२०१५ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर मोठे व मध्यम प्रकल्पातील आरक्षित पाणीसाठा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होणेकामी दि. ३१ जुलै २०१६ या कालावधीपर्यंत समवेत जोडलेल्या प्रपत्र - अ मध्ये दर्शविल्यानुसार आरक्षित करण्यात आला आहे. जलाशयातील आरक्षित पाणीसाठा कोणत्याही परिस्थितीत एकाच वेळी धरणातुन सोडता येणार नाही. त्यासाठी संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी धरणातील उपलब्ध पाण्याचा साठा, आरक्षित साठा व प्रत्येक महिन्याच्या शेवटी किती पाणी साठा शिल्लक राहील याचे समयबध्द नियोजन करावे. व दरमहा महिनाअखेरीस पाणी वापर अहवाल न चुकता जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडेस सादर करावा.

ज्या ठिकाणी नदी पात्रातुन पिण्यासाठी पाणी सोडावे लागेल अशा ठिकाणी सोडलेल्या पाण्याचा वापर अन्य कारणासाठी होणार नाही याबाबत याची संपूर्ण जबाबदारी सबंधीत पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, संबंधित नगरपालीका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व गटविकास अधिकारी, पं. स यांची राहील. तसेच सर्व कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग यांनी सर्व पाणी वापर संस्थांना पाणी काटकसरीने वापर करून जास्तीत जास्त पुरविणेबाबत कळवावे.

धरणातुन सोडावयाच्या पिण्याच्या पाण्याचा वार्षिक नियोजन आराखडा तयार करुन सदर आराखडा जिल्हाधिकारी यांची मंजुरी घेवुन त्याप्रमाणे पिण्याच्या पाण्याचे आवर्तन सोडणेची जबाबदारी संबंधीत कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग यांची राहील. सदर आराखड्याप्रमाणे विद्युत पुरवठा खंडीत करणे, अनाधिकृत पाणी उपसा बंद करणेबाबत सर्व संबंधीत यंत्रणांनी दक्षता घ्यावी. पिण्यासाठी आरक्षित करण्यात आलेले पाणी सिंचनासाठी वापरले जाणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी. तसेच कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभागांनी जलाशयातील उपलब्ध साठ्यातुन अनाधिकृत उपसा होवु नये याकरिता आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. सिंचनासाठी पाणी सोडणेपुर्वी या कार्यालयाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

लघु प्रकल्पातुन पाणी सोडण्यापुर्वी संबंधित उपविभागीय अधिकारी यांची पुर्व परवानगी घ्यावी. शासनाचे पाटबंधारे विभागाकडील दि. १०/०८/२०१४ चे शासन निर्णयात नमुद केलेप्रमाणे पाणीपट्टी रक्कम भरणेची जबाबदारी सर्व पाणी वापर संस्थांवर बंधनकारक राहील.

**जिल्हाधिकारी नाशिक**

प्रति,
आयुक्त महानगरपालीका नाशिक / मालेगाव
अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नाशिक
अधिक्षक अभियता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. (ग्रामीण) नाशिकरोड
मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प नाशिक
कार्यकारी अभियंता नाशिक पाटबंधारे विभाग नाशिक
कार्यकारी अभियंता पालखेड पाटबंधारे विभाग नाशिक
कार्यकारी अभियंता मालेगाव पाटबंधारे विभाग मालेगाव
कार्यकारी अभियंता उर्ध्व गोदावरी प्रकल्प विभाग नाशिक
कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि. प नाशिक
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक / मालेगाव
उपविभागीय अधिकारी (सर्व) उपविभाग
तहसिलदार (सर्व)
गटविकास अधिकारी, पं. स (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपरिषद (सर्व)
प्रत:- स्विय सहाय्यक मा. मंत्री जलसंपदा तथा पालकमंत्री नाशिक जिल्हा यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
स्विय सहायक मा. राज्यमंत्री सहकार, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीसाठी सादर.
पोलीस अधिक्षक नाशिक ग्रामीण यांचेकडेस माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**सही/-**
**जिल्हाधिकारी नाशिक**

## सन २०१५-१६ पाटबंधारे प्रकल्पाचे जलाशयातील पाणी आरक्षण बाबतचे विवरणपत्र

| अ. क्र. | कार्यकारी यंत्रणेचे नाव | धरणाचे नाव व ठिकाण | धरणाची साठवण क्षमता द.ल.घ.फू. | कद.१५/१०/१५ रोजीचा पाणीसाठा ल.द.घ.फू. | दि.२०/११/१५ रोजी उपयुक्त पाणीसाठा द.ल.घ.फू. | धरणातून पाणी आरक्षण करण्याचे कारण | पिण्याचे पाणी आरक्षण करावयाचे संस्थेचे नाव | सन २०१४-१५ साठी आरक्षण ल.द.घ.फू. | सन २०१४-१५ मध्ये प्रत्यक्ष पाणी वापर द.ल.घ.फू. | सन २०१५-१६ करिता पाणी आरक्षण द.ल.घ.फू. | सन २०१५-१६ करिता प्रत्यक्ष देण्यासाठी उपलब्ध पाणी (वहन व्ययासह) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. |
| १४ | कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, मालेगांव | चणकापूर ता.कळवण | २७१४ | २४२७ | २४१५ | पिण्यासाठी | मालेगाव शहर | १३५० | १२४८.२७ | १९०० | १७४२ |
| | | | | | | | सटाणा पाणीपुरवठा योजना | ८० | १०१.६५ | ८० | ८० |
| | | | | | | | रावळगाव ग्रामपंचायत | ५ | ० | ५ | ५ |
| | | | | | | | दाभाडी पाणीपुरवठा योजना व ११ गावे | ३०० | २८७.३९ | ३०० | ३०० |
| | | | | | | | दाभाडी (गिसाका) वस्ती | ४ | | ४ | ४ |
| | | | | | | | दाभाडी इंदिरानगर | ४ | | ४ | ४ |
| | | | | | | | अजंग सेक्शन | ५ | | ५ | ५ |
| | | | | | | | कळवण तालुका -अंबवणा, पालेखुर्द, बु. कळवण, बु. भादवन, पिलकोस जुनी व नवी वेज बगडू | १०० | ४९.२४ | ५० | ११४ |
| | | | | | | | फुले नगर, निवाला, महालपाटणे, तालुका- देवळा | १६ | ० | १६ | १६ |
| | | | | | | | देवळा प्रादेशिक ८ गावे | ४५ | ४८.२८ | ४५ | ४५ |
| | | | | | | | मेशी, वातोळा, डोंगरगाव तालुका-देवळा | १२ | ५४ | ५४ | ५० |
| | | | | | | | पिंपळगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना, तालुका देवळा | २० | ० | २० | ० |
| | | | | | | | सटाणा तालुक्यातील पाणीपुरवठा योजना लोहनेर, ठंगोरा, निंबोळा, वांद्री, ब्राह्मणगाव, लखमापूर, इत्यादी (कालव्याद्वारे) | ५० | ३४.३८ | ५० | ४० |
| | | | **२७१४** | **२४२७** | **२४१५** | | **एकूण** | **१९९१** | **५७४.९८** | **२५३३** | **२४०५** |

| अ. क्र. | कार्यकारी यंत्रणेचे नांव | धरणाचे नाव व ठिकाण | धरणाची साठवण क्षमता द.ल.घ.फू. | कद.१५/१०/१५ रोजीचा पाणीसाठा ल.द.घ.फू. | दि.२०/११/१५ रोजी उपयुक्त पाणीसाठा द.ल.घ.फू. | धरणातून पाणी आरक्षण करण्याचे कारण | पिण्याचे पाणी आरक्षण करावयाचे संस्थेचे नाव | सन २०१४-१५ साठी आरक्षण ल.द.घ.फू. | सन २०१४-१५ मध्ये प्रत्यक्ष पाणी वापर द.ल.घ.फू. | सन २०१५-१६ करिता पाणी आरक्षण द.ल.घ.फू. | सन २०१५-१६ करिता प्रत्यक्ष देण्यासाठी उपलब्ध पाणी (वहन व्ययासह) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, मालेगाव | केळझर, तालुका बागलाण | ५७२ | ५७२ | ५४० | पिण्यासाठी | सटाणा शहर | १० | १० | १० | २०० |
| | | | | | | | निकवेल, कधाणे, बोधाण, गुंजवाड, मळगाव, तिळवण, आराई, डांगसौदाणे, तालुका-बागलाण | ८० | ८० | ८० | ८० |
| | | | | | | | पिंपळगाव, द-हाणपाणीपुरवठा योजना, औंदाणे पाणीपुरवठा योजना तालुका -बागलाण | | | | |
| | | | **५७२** | **५७२** | **५४०** | | **एकूण** | **९०** | **९०** | **९०** | **२८०** |
| १६ | कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, मालेगाव | हरणबारी, तालुका बागलाण | ११६६ | ११६६ | ११५७ | पिण्यासाठी | मौसम नदीकाठावरील उद्भव विहिरीसाठी ता. बागलाण तहाराबाद, आसखेडा, जायखेडा, नामपूर, ब्राह्मणपाडे | | | | |
| | | | | | | | कोकीर प्रादेशिक पा. वु. योजना ता. बागलाण. गारेगाव पाणीपुरवठा योजना, ता. मालेगाव, मालेगाव तालुक्यातील गावे अजंग, वडल, वडनेर, खाकुर्डी, भायगाव, दयाने, इत्यादी ७ गावे | २९० | २९० | २९० | २९० |
| | | | | | | | वडेल बंधारा ते वडगांव बंधारा (अजंग, डाबली, वडेल, कास्टी, निळगव्हाण, वझीरखेड, वडगाव, दयाने) | ४० | ४० | १०० | १०० |
| | | | | | | | करंजाड, पारनेर, बुयाणे, निताणे, बिजोरे, आखतवाडे, अनंतपूर ता. बागलाण | ० | ० | १०० | १०० |
| | | | | | | | मांगीतुंगी ता. बागलाण येथे आंतरराष्ट्रीय कार्यक्रम | ० | १०० | १०० | १०० |
| | | | | | | | गटविकास अधिकारी मालेगाव, वडेल, वडनेर, खाखोडी गावासाठी | ० | ० | ३० | ३० |
| | | | | | | | नांदगाव, मुंगरी, बाके, नगाव दिगर, कोलाने, नि. मांजरे, सौंधाणे, बराणे, सोनज, पाटणे, चंदनपुरी, आघार बु. अजंग, वडेर, खाकुर्डी, वडनेर, निलगव्हाण, काष्टी, वडगाव, वझीरखेड, ता. मालेगाव | ० | ० | ४५० | ४५० |
| | | | **११६६** | **११६६** | **११५७** | | **एकूण** | **३३०** | **४३०** | **१०७०** | **१०७०** |

| अ. क्र. | कार्यकारी यंत्रणेचे नाव | धरणाचे नाव व ठिकाण | धरणाची साठवण क्षमता द.ल.घ.फू. | कद.१५/१०/१५ रोजीचा पाणीसाठा ल.द.घ.फू. | दि.२०/११/१५ रोजी उपयुक्त पाणीसाठा द.ल.घ.फू. | धरणातून पाणी आरक्षण करण्याचे कारण | पिण्याचे पाणी आरक्षण करावयाचे संस्थेचे नाव | सन २०१४-१५ साठी आरक्षण ल.द.घ.फू. | सन २०१४-१५ मध्ये प्रत्यक्ष पाणी वापर द.ल.घ.फू. | सन २०१५-१६ करिता पाणी आरक्षण द.ल.घ.फू. | सन २०१५ १६ करिता प्रत्यक्ष देण्यासाठी उपलब्ध पाणी (वहन व्ययासह) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | कार्यकारी अभियंता, ल. पा. विभाग, मालेगाव | नाग्यासाक्या, ता. नांदगाव | ३९७ | ० | ० | पिण्यासाठी | नांदगाव व चांदवड तालुक्यातील ४२ गावे पाणी पुरवठा योजना | ७० | ८५ | ८५ | ४०(मृत साठ्यातून) |
| | | | | | | | टँकर भरण्यासाठी | ३० | ३० | ० | ० |
| | | | **३९७** | **०** | **०** | | **एकूण** | **१००** | **११५** | **८५** | **४०** |
| १८ | कार्यकारी अभियंता, गिरणा नदीखोरे प्रकल्प विभाग, नाशिक | पुनंद, | १४०४ | १३०६ | १३०६ | पिण्यासाठी | महालपाटणे व देवपूरपाडा येथील गावांच्या पिण्याच्या पाण्यासाठी | १०० | ३२४ | १००० | ७०० |
| | | | | | | | लोहणेर, ढेगोडा, निंबाळा, वांद्री, ब्राह्मणगाव, लखमापूर, ठेहरे, गावापर्यंत इत्यादी (कालव्याद्वारे) गावापर्यंत नदी पात्रातून (सिद्धेश्वर को.प. बंधारा भरण्यासाठी) | २०० | | | |
| | | | | | | | डोण, शिवारात, सटवाई वाडी, ता. देवळा येथील पाझर तलाव भरण्यासाठी | ७ | ७ | ७ | १९० |
| | | | | | | | मेडी, तालुका कळवण | १० | १० | १० | |
| | | | | | | | मानूर, ता. कळवण | ४ | ४ | ४ | |
| | | | | | | | तालुका देवळा कालव्याद्वारे | ० | ० | ३८ | |
| | | | | | | | सटाणा शहर | २०० | २०० | ३०० | २०० |
| | | | | | | | ककाणे, खेडगाव, दरेमणगी, रावळाजी, दह्याने भतान, दि. गनोरे, नालींद, देसराणे, धाडे, दि. पिळखोरा, मोकमणगी, कडकी, भाद्वा, विसापूर,जयदर, ता. कळवण | ० | ० | ५० | ५० |
| | | | **१४०४** | **१३०६** | **१३०६** | | **एकूण** | **५२१** | **५४५** | **१४०९** | **११४०** |

| अ. क्र. | कार्यकारी यंत्रणेचे नाव | धरणाचे नाव व ठिकाण | धरणाची साठवण क्षमता द.ल.घ.फू. | कद.१५/१०/१५ रोजीचा पाणीसाठा ल.द.घ.फू. | दि.२०/११/१५ रोजी उपयुक्त पाणीसाठा द.ल.घ.फू. | धरणातून पाणी आरक्षण करण्याचे कारण | पिण्याचे पाणी आरक्षण करावयाचे संस्थेचे नाव | सन २०१४-१५ साठी आरक्षण ल.द.घ.फू. | सन २०१४-१५ मध्ये प्रत्यक्ष पाणी वापर द.ल.घ.फू. | सन २०१५-१६ करिता पाणी आरक्षण द.ल.घ.फू. | सन २०१५-१६ करिता प्रत्यक्ष देण्यासाठी उपलब्ध पाणी (वहन व्ययासह) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | कार्यकारी अभियंता, गिरणा नदी खोरे, प्रकल्प विभाग नाशिक | माणिक पुंज | ४९५ | ११७ | ९७ | पिण्यासाठी | नांदगाव नगरपालिका (उपसा) | ७० | ७० | ७० | ७० |
| | | | | | | | मूळडोंगरी, सादरगांव, बाभुळवाडी, विरोले, न्यायडोंगरी, चांदोरा, साकोस ता. नांदगाव (नदीद्वारे) | ० | ० | २० | २० |
| | | | | | | | जळगांव बु. कासारी, माणिकपुंज, बाणगाव, टाकळी, कसाबखेडा, पोही, गणेशनगर ता. नांदगाव (उपसाद्वारे) | ४५ | ४५ | ३५ | ३५ |
| | | | | | | | जळगांव खु. ज जळगांव बु., पिंपरखेड, ता. नांदगाव (कालवा) | ० | ० | ३५ | ३५ |
| | | | | | | | परघाडी, विप्री हवेली ता. नांदगाव | ० | ० | | |
| | | | ४९५ | ९७ | ९७ | | **एकूण** | **११५** | **११५** | **१६०** | **१६०** |
| | बिगर सिंचन आरक्षण | | | | | | एकूण एकंदर | १३३८७.५० | १०७१२.२२ | १५९२५.५२ | १५००८.७७ |
| | गिरणा पाटबंधारे विभाग जळगांव | गिरणा प्रकल्प | १८५०० | २००० | १८३५ | पिण्यासाठी | मालेगाव शहर ता. मालेगाव | | | १००० | |
| | | | | | | | नांदगाव व मालेगाव ५६ खेडी योजना | | | ३०० | |
| | | | | | | | पांझण नदीद्वारे | | | १०० | |
| | | | | | | | कळवाडी गट ता. मालेगाव (ग्रा.पं. उंबरदे, चिंचगव्हाण, नरडाणे, कलवाडी, साकुर, दापुरे, देवघट | | | १०० | |
| | | | | | | | दहीवाळ व २५ गावे प्रादेशिक पा.पु. योजना ता. मालेगाव | | | १० | |
| | | | | | | | **एकूण** | | | **१५५०** | |

सही/-
कार्यकारी अभियंता
नाशिक पाटबंधारे विभाग नाशिक

सही/-
कार्यकारी अभियंता
पालखेड पाटबंधारे विभाग नाशिक

सही/-
कार्यकारी अभियंता
मालेगाव पाटबंधारे विभाग नाशिक

सही/-
कार्यकारी अभियंता
गिरणा नदी खोरे प्रकल्प नाशिक

सही/-
अधिक्षक अभियंता व प्रशासक
लाभक्षेत्र प्राधिकरण नाशिक

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

सही/-
जिल्हाधिकारी
नाशिक

सही/-
मा. पालकमंत्री नाशिक जिल्हा

Annexure V (जोडपत्र – ५)

## धरणातील आरक्षित पाणी तक्ता (सन २०१५-१६)

| अ.क्रं. | प्रकल्पाचे नाव | संकल्पित उपयुक्त पाणीसाठा (द.ल.घ.फु.) | उपयुक्त पाणीसाठा (सन २०१५) (द.ल.घ.फु.) | सन २०१५-१६ या वर्षाकरिता पिण्याचे पाण्याचे करणेत आलेले आरक्षण (द.ल.घ.फु.) |
|---|---|---|---|---|
| १. | चणकापूर | २७१४ | २४१५ | २४०५ |
| २. | हरणबारी | ११६६ | ११५७ | १०७० |
| ३. | केळझर | ५७२ | ५४० | २८० |
| ४. | पुनंद | १४०४ | १३०६ | ११४० |
| एकुण | | ५८३६ | ५४१८ | ४८९५ |

| Annexure V A (जोडपत्र ५ अ) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक १/११/२०१५ ते १५/७/२०१६ पर्यंत पिण्याच्या पाण्याची आवश्यकता – चणकापुर ?? निहाय | | | | | | |
| अ. क्र. | जलाशय | पिण्याचे पाणी आरक्षण करावयाचे संस्थेचे नाव | लोकसंख्या | पिण्याच्या पाण्याची गरज | बाष्पीभवन व्यय | एकुण |
| १ | चणकापूर दि. ३१/१०/१५ रोजीचा साठा ६८.७२ द.ल.घ.मी. | मालेगाव शहर | ७१७७१५ | ७९.६७ | ७.९६ | ८७.६३ |
| | | रावळगाव ग्रामपंचायत | ११९४७ | ०.५८ | ०.०५ | ०.६३ |
| | | दाभाडी १२ गाव पाणी पुरवठा योजना | ८२०६० | ४.२५ | ०.४२ | ४.६७ |
| | | लखमापूर, ब्राह्मणगाव | ३३३४७ | १.७३ | ०.१७ | १.९० |
| | | कळवण तालुका | ११५२६७ | ५.९६ | ०.५९ | ६.५५ |
| | | सटाणा शहर | ४५९८० | ७.७१ | ०.७७ | ८.४८ |
| | | एकुण चणकापूर धरण | १००५५१६ | ९९.९० | ९.९६ | १०९.८६ |

| Annexure V B (जोडपत्र ५ बी) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पिण्याच्या पाण्याची आवश्यकता ???? | | | | | | | | | | |
| अ. क्र. | खोरे | प्रकल्पाचे नाव | योजनेचे नाव | ?? लोकसंख्या | प्रचलित निकष (दर दिवशी दरडोई लिटर) | प्रत्यक्ष पिण्याच्या उद्देशाने पाण्याची आवश्यकता Mcum | ?? % योजनेसाठी नुकसान | शिल्लक पाण्याची आवश्यकता १-११-२०१५ ते १५-०७-२०१६ Mcum | प्रेषण नुकसान % (चणकापूर-५०) | १-११-२०१५ ते १५-७-२०१६ पर्यंत अभिवहन नुकसानासहित पाण्याची आवश्यकता - Mcum |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | गिरणा | चणकापूर | मालेगाव महानगरपालिका | ७१७७१७ | १५० | २७.८८ | ११.९५ | ३९.८३ | ३९.८३ | ७९.६७ |
| | | | रावळगाव ग्राम पंचायत | १११४७ | ७० | ०.२० | ०.०९ | ०.२९ | ०.२९ | ०.५८ |
| | | | दाभाडी आणि १२ गाव पाणी पुरवठा योजना | ८२०६० | ७० | १.४९ | ०.६४ | २.१३ | २.१३ | ४.२५ |
| | | | लखमापुर, ब्राह्मणगाव पाणी पुरवठा योजना | ३३३४७ | ७० | ०.६० | ०.२६ | ०.८६ | ०.८६ | १.७३ |
| | | | कळवण तालुका-अभोणे, पाले, कळवण, भादवन, पिलकोस, जुनी बेज, नवीबेज | ११५२६७ | ७० | २.०९ | ०.९० | २.९९ | २.९९ | ५.९७ |
| | | | सटाणा शहर | ४५९८० | १५० | १.८९ | ०.८१ | २.७० | ५.०१ | ७.७१ |
| | | | एकुण चणकापूर | १००५५१८ | | ३४.१६ | १४.६४ | ४८.८० | ५१.११ | ९९.९० |

**विषय :** गिरणा प्रकल्प माहिती
**प्रेषक :** cadajalgaon jalgaon (cadajalgaon@gmail.com)
**प्रति :** mwrra__eer@yahoo.co.in;
**सीसी :** mwrra@mwrra.org;
**दिनांक :** गुरुवार, १० डिसेंबर २०१५ सकाळी ११:५९

---

**संलग्नक**

- GIRNA — Project (MWRRA).rar (८.७८ MB)

## गिरणा प्रकल्प

## दि. १५/१०/२०१५ ते ३१/७/२०१५ पर्यंत होणारा पाणी वापराचा तपशील

-----------------------------------------------------------------------

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | **दि.१५/१०/२०१५ रोजीचा साठ्यानुसार नियोजन** | | |
| | उपयुक्त साठा | १९९९ | दलघफू |
| | मृत साठा | ३००० | दलघफू |
| | **एकूण** | **४९९९** | **दलघफू** |
| **ब)** | **गाळ सर्वेक्षणानुसार कमी झालेली क्षमता** | | |
| | उपयुक्त (एकुण आलेला गाळ ५०० दलघफू पैकी उपलब्ध उपयुक्त पाणीसाठ्यातील परिमाण अंदाजे) | २५० | दलघफू |
| | मृत | १००० | दलघफू |
| | **एकूण** | **१२५०** | **दलघफू** |
| क) | **वापरण्यासाठी उपलब्ध असलेले पाणी** | | |
| | उपयुक्त | १७४९ | दलघफू |
| | मृत | २००० | दलघफू |
| | **एकूण** | **३७४९** | **दलघफू** |
| **ड)** | **धरणातून वापरता न येणारे पाणी** | ५०० | **दलघफू** |
| **इ)** | **धरणातून वापरण्यायोग्य पाणी (क-ड)** | ३२४९ | दलघफू |
| **ई)** | **धरणातून होणारा बिगरसिंचन पाणीवापर** | | |
| | **जलाशयावरुन** | | |
| i) | मालेगाव शहर २८५ x १.१ | ३१४ | दलघफू |
| ii) | नांदगाव व इतर गावे व इतर योजना - २८५ x १.९० | ५४२ | दलघफू |
| | **एकूण** | **८५६** | **दलघफू** |
| | **नदीतून** | | |
| | गिरणा धरण ते दहिगांव बंधाऱ्यापर्यंत | | |
| i) | दोन आवर्तन ६०० दलघफू प्रमाणे | १२०० | दलघफू |
| ii) | दोन आवर्तने ७०० दलघफू प्रमाणे | १४०० | दलघफू |
| | **एकूण** | **२६००** | **दलघफू** |
| | **एकूण बिगरसिंचन पाणी (जलाशय +नदी)** | **३४५६** | **दलघफू** |
| फ) | **धरणातून होणारे बाष्पीभवन २८५ x ४** | **११४०** | **दलघफू** |
| ग) | **एकूण पाण्याची आवश्यकता** | **४५९६** | **दलघफू** |
| घ) | **धरणात लागणारे अधिकचे पाणी (ग-इ)** | **१३४७** | **दलघफू** |

टिप - मृत साठ्यामध्ये ३८१.०० मी. पातळीच्या खाली नांदगांव व ५६ गांवे यांचे पाणी उचलणे बंद होत असल्याने व मालेगांव,दहिवाळ व २५ गांवे यांची जॅकवेल पातळी ३७५.०० मी. च्या खाली जाणार आहे. सदर पाणी वापर संस्थेने पाणी उचलणे साठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव (टंचाई शाखा)

---

दुरध्वनी क्रं. ०२५७-२२२३१८०      Email - scy.jalgaon@gmail.com      फॅक्स क्रं. ०२५७-२२०५००, २२१७१९३

कं.म.शा.टंचाई-२/ई-टपाल/२०१५/७/५०/२६२०      दिनांक :- २३/११/२०१५

**वाचले :- १) शासन निर्णय क्र/संकीण/१००३/(३१०/३) सिंव्य (धो) दिनांक १०/०८/२००४**
**२) मुख्याधिकारी, नगरपरिषद भडगाव यांचेकडील पत्र जा.क्र./भनप/१२९२/२०१५ दिनांक ०३/११/२०१५**
**३) मुख्याधिकारी, नगरपरिषद पाचोरा यांचेकडील पत्र जा.क्र.पापु/टंचाई/५५१/२०१५ दिनांक ३/११/२०१५**
**४) कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव यांचेकडील पत्र जा.क्र.गिपावि/प्रशा-५/५४८५ २०१५ दिनांक २१/११/२०१५**

**आदेश**

उपोद्‌घातातील अ.क्र. २ व ३ अन्वये मुख्याधिकारी भडगाव व पाचोरा यांनी सद्यस्थितीत भडगाव व पाचोरा शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या योजनांमध्ये अल्प प्रमाणात पाणी साठा असल्याने शहरास ७-८ दिवसाआड पिण्याचा पाणी पुरवठा होत असल्याने पिण्याच्या पाणी टंचाई निवारणार्थ गिरणा धरणातुन पाण्याचे १ आवर्तन सोडणेबाबत इकडील कार्यालयास विनंती केलेली आहे.

सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता गिरणा पाटबंधारे विभाग जळगांव यांचेकडून अहवाल मागविले असता त्यांनी उपोद्घातातील अ.क्र. २ अन्वये सन २०१५-१६ करीता १९६६.६५ दलघफूट बिगरसिंचन आरक्षण केले असून सद्यस्थितीत गिरणा धरणामध्ये दिनांक २१/११/२०१५ रोजी उपयुक्त पाणी साठा १७३६ दलघफू (९.३९%) असलेबाबत कळविले आहे.

त्या अनुषंगाने मी जिल्हाधिकारी जळगांव, या आदेशान्वये भडगाव व पाचोरा या शहराला पाणी टंचाई निवारणार्थ दिनांक २४/११/२०१५ रोजी ६५० दलघफू बिगर सिंचन आवर्तन सोडणेस मंजुरी देत आहे.


स्वाक्षरीत /-

**जिल्हाधिकारी जळगांव**

**प्रत :-** १) कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग जळगांव यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
२) जिल्हा प्रकल्प अधिकारी न.पा. शाखा जि.का. जळगांव यांना माहितीसाठी
३) मुख्याधिकारी, नगरपरिषद भडगाव/पाचोरा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.


२/- कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग जळगांव यांनी भडगाव न.पा.कडे र.रू. ३.७३ लक्ष व पाचोरा न.पा.कडे १०.२७ लक्ष पाणी आवर्तन थकबाकी असलेबाबत नमुद केले आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी आपण स्वत: त्यांचे कार्यालयाशी संपर्क करुन थकबाकीची रक्कम अदा करणेकामी कार्यवाही करावी.

**जिल्हाधिकारी जळगांव करिता**


Location Map For Showing
Malegaon & Other water supply scheme in Girna dam
TBL 1318 ft.
Crest Level 1279 ft (389.84 m.) 9717 mcft
P.L.B.C. Sill level
1254.25 ft
382.75 m
(3267.50mcft)
Approach Channel 1253.34ft 382 m (3111.76mcft)
MDDL 1252.86 ft 381.97 m (3033 mcft)
Dead Storage
चाळीसगांव
जॅकवेल
Approach Channel
1252 ft 381.70 m. (2892mcft)
1230.31 ft (375)
(575.32 mcft)
Jackwell intake
Irrigation & Scouring sluice
Sill Level 1225 ft. ( 373.38 m.)
( 330 mcft.)
371.90
GIRNA IRRIGATION DIVISION
Location Map For Showing
Malegaon & Other Water
Supply Scheme In Girna Dam

# कार्यकारी अभियंता,गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव अंतर्गत
## गिरणा प्रकल्प - अंतर दर्शक नकाशा

| स्थान | कि.मी. | मोठया पुराचा वहन वेळ (अंदाजे तास) |
|---|---|---|
| १)चणकापूर ते गिरणा धरण | १०० | ९.०० |
| २) गिरणा धरण ते तापी संगम | १६७ | १५.३० |
| ३) हतनूर ते प्रकाशा | १८३ | १७.०० |




20

# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव (टंचाई शाखा)

-----------------------------------------------------------------------------------

दुरध्वनी क्रं. ०२५७-२२२३१८०  Email - scy.jalgaon@gmail.com  फॅक्स क्रं. ०२५७-२२०५००, २२१७१९३

कं.म.शा.टंचाई-२/ २०१५/७/५०/२५४३  दिनांक :- ५/११/२०१५

**वाचले :- १) शासन निर्णय क्र/संकीण/१००३/(३१०/३) सिंव्य (धो) दिनांक १०/०८/२००४**

**२) इकडील कार्यालयाचे पत्र क्र.म शा/टंचाई/कावि/२०१५/७/५०/८५३ दिनांक १९/०८/२०१५**

**३) सन २०१५-१६ पाणी आरक्षण बैठक दिनांक ०४/११/२०१५ रोजीच्या बैठकीत मान्य केलेला प्रस्ताव**

-०-०-०-०-०-०-०-०-०-०-

## आदेश

सन २०१५-१६ करीता जळगांव जिल्हयातील मोठे व मध्यम प्रकल्पातील पाणी आरक्षणाची बैठक **मा.ना.श्री. एकनाथरावजी खडसे, मंत्री (महसुल/मकापुभुपु/अविव/कृफ/पदुम/राउश) महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री जिल्हा जळगांव** यांचे अध्यक्षतेखाली **दिनांक ०४/११/२०१५** ला जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव येथे आयोजीत करण्यात आलेली होती.

सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे पाणी आरक्षणाला उपोद्घातील ३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच उपोद्घातातील २ अन्वये मोठे व मध्यम प्रकल्पातील आरक्षित पाणीसाठा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होणेकामी यापुर्वीच आरक्षित करण्यात आलेला आहे. तथापी सदर बैठकीमध्ये जलाशयातील पाणी वापर संस्थासाठी आरक्षित करण्यत आलेला पाणीसाठा कोणत्याही परिस्थितीत एकाच वेळी धरणातुन सोडता येणार नाही. त्यासाठी संबंधित कार्यकारी अभियंता यांनी धरणातील उपलब्ध पाण्याचा साठा आरक्षित पाणीसाठा व प्रत्येक महिन्याच्या शेवटी किती पाणी साठा शिल्लक राहिल यांचे समयबध्द नियोजन करावे.

ज्या तलावातुन रब्बी पिक व उन्हाळी पिक यासाठी कालव्यातुन पाणी दिले जाईल त्यावेळी परिसरातील साठवण तलाव पाणी पुरवठा योजनांचे उदभव किंवा अन्य साधनात पाणी भरुन घ्यावे. म्हणजे नागरीकांची पिण्याच्या पाण्याची गरज त्यावेळी भागविली जाऊन पाण्याची वहन तुट कमी प्रमाणात होईल.

ज्या ठिकाणी नदी पात्रातुन पाणी सोडावे लागेल अशा ठिकाणी सोडलेल्या पाण्याच्या वापर अन्य कारणासाठी होणार नाही यांची संपुर्ण जबाबदारी संबधित पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, संबंधित नगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व गट विकास अधिकारी यांची राहील.

धरणातुन पाणी सोडण्यापूर्वी जिल्हाधिकारी जळगांव यांची आगाऊ परवानगी घ्यावी. पिण्यासाठी राखून ठेवलेले पाणी सिंचनासाठी वापरणार नाही यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच लघु तलावातून पाणी सोडताना उपविभागीय अधिकारी यांची पुर्व परवानगी घ्यावी.

**जिल्हाधिकारी जळगांव**

प्रति,

१) म. विभागीय रेल्वे व्यवस्थापक, मध्य रेल्वे, भुसावळ

२) म. मुख्य अभियंता, दिपनगर औष्णिक विद्युत प्रकल्प दिपनगर ता. भुसावळ

३) म. अधिक्षक अभियंता, तथा लाभक्षेत्र विकास प्राधिकरण जळगांव

४) म. अधिक्षक अभियंता, जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ जळगांव

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव

## विवरणपत्र

## सन २०१५-२०१६ या वर्षात पिण्याच्या पाण्यासाठी पाटबंधारे प्रकल्पाचे जलाशयातील पाणी बिगर सिंचन आरक्षण करण्याबाबत

| अ.क्र. | कार्यकारी यंत्रणेचे नाव (संबंधीत पाटबंधारे विभाग) | धरणाचे/ मध्यम प्रकल्पाचे ठिकाण व तालुका | धरणाचे मध्यम प्रकल्पाची साठवण क्षमता (द.ल.घ.फु.) | पाणी आरक्षण कोणासाठी करण्यात येणार आहे (पाणी वापर संस्था) | दिनांक १५/१०/१५ रोजी असलेला उपयुक्त पाणी साठा (द.ल.घ.फु.) | सन २०१४-२०१५ साली पाणी वापर संस्थासाठी आरक्षीत करून ठेवण्यात आलेले पाणी (द.ल.घ.फु.) | चालू वर्षी पाणी वापर संस्थानी करावयाची मागणी | नदीतील वहनव्यय (दलघफु) | चालू वर्षी पाणी वापर संस्थासाठी आरक्षित करण्यात आलेले पाणी (सन २०१५-१६) (द.ल.घ.फू.) प्रस्तावित | दिनांक ०४/११/२०१५ रोजीच्या बैठकीत आरक्षित केलेले पाणी (दलघफू) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव | गिरणा धरण ता. नांदगाव | १८४९.०० | **१) गिरणा जलाशय** | १९९९.०० / - | | | | | | |
| | | | | नांदगाव व मालेगाव तालुक्यातील ५६ गावे | | १३९.०० | १३९.०० | ०.०० | १३९.०० | १३९ | |
| | | | | मालेगांव म.न.पा. | | ५२५.०० | ८००.०० | ०.०० | १५०.००. | | |
| | | | | दहिवाळ व २५ गावे सा.पा.पु.योजना | | २०.०० | २०.०० | ०.०० | २०.००. | | |
| | | | | चाळीसगांव नगरपालिका जि. जळगांव | | ११७.०० | ११७.०० | ०.०० | ११७.००. | | |
| | | | | **गिरणा जलाशय एकूण** | | **८०१.००** | **१०७६.००** | **०.००** | **४२६.००** | | |
| | | | | **२)गिरणा जलाशय ते जामदा बंधारा** | | | | | | | |
| | | | | गिरणा नदीकाठावरील १०८ गावे एरंडोल,भडगाव,चाळीसगांव | | ६२४.५० | ६२४.५० | ३१२.२५ | ९३६.७५. | | |
| | | | | खरजईसह १४ गावे ता. चाळीसगांव | | ३३.०० | ३३.०० | १६.५०. | ४९.५० | | |
| | | | | **गिरणा जलाशय खाली ते जामदा बंधारा एकुण** | | **६५७.५०** | **६५७.५०** | **३२८.७५** | **९८६.२५** | | |
| | | | | **३) जामदा बंधारा ते दहिगाव बंधारा** | | | | | | | |
| | | | | नगरपालिका पाचोरा | | ७७.०० | ५५.५५ | ३८.५० | ११५.५० | | |
| | | | | हनुमंतखेडे व २५ गावे, ता.एरंडोल | | ४१.६० | ४१.६० | २०.८० | ६२.४० | | |
| | | | | महिंदळे,पळासखेडे,टिटवी तांडा ता.भडगाव | | ३०.०० | ३०.०० | १५.०० | ४५.०० | | |
| | | | | आमडदे ग्रापापु ता.भडगाव | | ६.०० | ६.०० | ३.०० | ९.०० | | |
| | | | | कजगावसह ४ गावे ता.भडगाव | | ११.०० | ११.०० | ५.५० | १६.५० | | |
| | | | | माहिजी सह ३ गावे ता.पाचोरा | | ५.०० | ५.०० | २.५० | ७.५० | | |
| | | | | आडगाव व १५ गावे ता.एरंडोल | | ५५.०० | ५५.०० | २७.५० | ८२.५० | | |

## सन २०१५ -२०१६ या वर्षात पिण्याच्या पाण्यासाठी पाटबंधारे प्रकल्पाचे जलाशयातील पाणी बिगर सिंचन आरक्षण करण्याबाबत

| अ.क्र. | कार्यकारी यंत्रणेचे नाव (संबंधीत पाटबंधारे विभाग) | धरणाचे / मध्यम प्रकल्पाचे ठिकाण व तालुका | धरणाचे मध्यम प्रकल्पाची साठवण क्षमता (द.ल.घ.फु.) | पाणी आरक्षण कोणासाठी करण्यात येणार आहे (पाणी वापर संस्था) | दिनांक १५/१०/१५ रोजी असलेला उपयुक्त पाणी साठा (द.ल.घ.फु.) | सन २०१४-२०१५ साली पाणी वापर संस्थासाठी आरक्षीत करून ठेवण्यात आलेले पाणी (द.ल.घ.फु.) | चालू वर्षी पाणी वापर संस्थानी करावयाची मागणी | नदीतील वहनव्यय (दलघफू) | चालु वर्षी पाणी वापर संस्थासाठी आरक्षित करण्यात आलेले पाणी (सन २०१५-१६) (द.ल.घ.फू) प्रस्तावित | दिनांक ०४/११/२०१५ रोजीच्या बैठकीत आरक्षित केलेले पाणी (दलघफू) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कार्यकारी अभियंता गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव | गिरणा धरण ता. नांदगाव | | पिंपळगाव म्हाळसा ता.चाळीसगाव | १९९९.०० | ८.०० | ८.०० | ४.०० | १२.०० | | |
| | | | | पिलखोड ता.चाळीसगाव | | १४.०० | १४.०० | ७.०० | २१.०० | | |
| | | | | गिरड व दोन गावे ता भडगाव | | ३५.०० | ३५.०० | १७.५० | ५२.५० | | |
| | | | | शिंदो पापु योजना ता भडगाव | | १३.०० | १३.०० | ६.५० | १९.५० | | |
| | | | | पिंपळगाव बु.पाणीपुरवठा योजना ता.भडगाव | | ५.०० | ५.०० | २.५० | ७.५० | | |
| | | | | लोण प्र.अ.तालुका भ्डगाव पाणी पुरवठा योजना ता.भडगाव | | ४.०० | ४.०० | २.०० | ६.०० | | |
| | | | | कळमडू व ४४ गावे तालुका चाळीसगाव | | ८.०० | ८.०० | ४.०० | १२.०० | | |
| | | | | नगरपालिका भडगाव | | ५०.०० | ५०.०० | २५.०० | ७५.०० | | |
| | | | | देवळी | | ७.०० | ७.०० | ३.५० | १०.५० | | |
| | | | | **जामदा बंधारा ते दहिगाव बंधारा एकुण** | | **३६९.६०** | **३४८.१५** | **१८४.८०** | **५५४.४०** | | |
| | | | | **एकुण गिरणा** | | **१८२८.१०** | **२०८१.६५** | **५१३.५५** | **१९६६.६५** | | |
| २ | कार्यकारी अभियंता गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव | मन्याड प्रकल्प | १४२२.०० | **मन्याड धरण** | २६२.०० | | | | | | |
| | | | | काकडणेसह ५ गावे ता.चाळीसगाव | | ११.०० | ११.०० | ०.०० | ११.०० | | |
| | | | | बेहळगाव पळाशीसह ४ गावे ता.नांदगाव जि.नासिक | | ११.०० | ११.०० | ०.०० | योजना बंद | | |
| | | | | सायगाव,पाणीपुरवठा योजना | | ७.०० | ७.०० | ३.५० | १०.५० | | |
| | | | | **मन्याड धरणातुन आरक्षीत होणारा एकुण पाणी साठा (द.ल.घ.फू)** | | **२९.००** | **२९.००** | **३.५०** | **२१.५०-** | | |
| ३ | कार्यकारी अभियंता गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव | बोरी धरण ता. पारोळा | ८८८.०० | बाबरे व ७ गावे पा.पु योजना (बाबरे, कुडाणे,वेल्हाणे,हरसूणे,बोरविहिर,विसरणे बोधगाव, धामणगाव) | ०.० (४४०.३८मृत साठा) | ८.०० | ८.०० | ०.०० | ८.०० | | |
| | | | | पारोळा नगरपालिका | | १७५.०० | ७५.०० | ०.०० | ७५.०० | | |
| | | | | तामसवाडी व ४ गावे पा.पु.योजना | | २७.०० | २७.०० | ०.०० | २७.०० | | |
| | | | | बोळे व ६ गावे पा.पु.योजना | | १७.०० | १७.०० | ०.०० | १७.०० | | |
| | | | | फागणे २० गावे पा.पु.योजना | | ४८.०० | ४८.०० | ०.०० | ४८.०० | | |
| | | | | देवगाव,उंदिरखेडे व १४ गावे | | १२५.०० | १२५.०० | ०.०० | ०.०० | धरणात मृत साठा असल्यामुळे पाणी देता येणार नाही | |
| | | | | **बोरी धरणातुन आरक्षीत होणारा एकुण पाणी साठा (द.ल.घ.फू)** | | **४००.००** | **३००.००** | **०.००** | **१७५.००** | | |

**२०१५ चे प्रकरण क्रमांक ८**

**गिरणा उप-खोऱ्यातील प्रवाहाविरुद्ध धरणांमधून गिरणा जलाशयात पाणी सोडण्याच्या बाबतीत**

श्री. उन्मेष पाटील, आमदार चाळीसगांव **... याचिकाकर्ते**

**विरुद्ध**

सचिव (जलसंपत्ती व्यवस्थापन आणि अधिकार क्षेत्र विकास),
जलसंपत्ती विभाग नबत्राकाटा आणि इतर **... प्रतिवादी**

**अधीक्षक अभियंता आणि प्रशासक, अधिकार क्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव यांच्या वतीने उत्तरात दिलेले प्रतिज्ञापत्र**

मी, संभाजी जगन्नाथ माने वय: ४६ वर्षे, व्यवसाय: सेवा-कार्यकारी अभियंता, गिरणा सिंचन विभाग जळगांव, जिल्हा: जळगांव, खालील प्रमाणे गंभीर निवेदनाद्वारे सांगतो:-

१. की, अधीक्षक अभियंता आणि प्रशासक अधिकार क्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव यांनी दिनांक ०५ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या रोजनामा अ. क्र. ११ मुद्दा क्र. III ला उत्तर देण्यासाठी मला अधिकृत केले आहे.

२. वर उल्लेख केलेल्या मुद्दा क्रमांक (III) संदर्भात, मी सांगतो आणि सादर करतो की, दिनांक ९/५/१९८६ रोजीचे शासकीय पत्र क्र. सीडीए/१३८५/१३८६/३९५, सीएडी (पावाकृ), मालेगाव पाणी पुरवठा योजनेसाठी दरवर्षी १४.१५ दशलक्ष घनमीटर (MCUM) (५०० दशलक्ष घनफूट (mcft)) पाणी आरक्षण मंजूर केले जाते आणि मालेगाव पाणी पुरवठा योजनेसाठी टप्पा-II, भाग-I मध्ये दरवर्षी ११.३२ दशलक्ष घनमीटर (MCUM) (४०० दशलक्ष घनफूट (mcft)) अतिरिक्त पाणी आरक्षण मंजूर केले जाते. अशा प्रकारे (दिनांक ७/५/१९९७ रोजीचे सिंचन विभाग मंत्रालय, मुंबई पत्र क्र. सीएडी/१३८९/२३३९/४८५/सीएडी (पावाकृ) नुसार) मालेगाव पाणी पुरवठा योजनेसाठी एकूण वार्षिक आरक्षण २५.४७ दशलक्ष घनमीटर (९०० दशलक्ष घनफूट) आहे.

३. परिच्छेद क्र. ११ मुद्दा क्र. (i) आणि (ii) मध्ये दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या सुनावणीच्या रोजनाम्यात महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या निर्देशानुसार उल्लेख केलेल्या चणकापूर धरणातून मालेगाव शहराचे आरक्षण अधीक्षक अभियंता आणि प्रशासक, अधिकार क्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांवशी संबंधित नाही आणि कोणतीही टिप्पणी दिली जात नाही.

नमूद केले आणि नोंदणी केले
अ.क्र. : **६८४११५**
दिनांक : २७ नोव्हेंबर २०१५

NOTARY STAMP

NOTARY SEAL

**ॲड. हेमंत एच. मुदलियार**
**नोटरी - गव्हर्नमेंट ऑफ इंडिया**
बेसमेंट, जेटी चेंबर्स, एचडीएफसी एटीएम
जिल्हा न्यायालयासमोर, जळगांव-४२५००१ (महाराष्ट्र राज्य).
दूरध्वनी क्र. (ऑफिस) : २२३५८२५, निवास : २२५५०००
मोबाइल नंबर ९८२३०७३२००

४.	माझ्या माहिती प्रमाणे आणि कार्यालयीन दस्तऐवजांमधून गोळा केलेल्या माहितीप्रमाणे या प्रतिज्ञापत्रातील मजकूर खरा आणि बरोबर आहे. गरज असल्यास कोणत्याही कारणास्तव प्रतिज्ञापत्रात काही समावेश करण्यासाठी, त्यात सुधारणा करण्यासाठी, बदलण्यासाठी किंवा हटवण्यासाठी परवानगी पदाधिकारी देत आहे.
त्यामुळे हे प्रतिज्ञापत्र बनविले आहे.

दिनांक: २७/११/२०१५
स्थळ: जळगांव

पदाधिकाऱ्याची सही

कार्यकारी अभियंता
गिरणा सिंचन विभाग
जळगांव.

## पडताळणी

मी, संभाजी जगन्नाथ माने, वय: ४६ वर्षे, व्यवसाय, सेवा- कार्यकारी अभियंता, गिरणा सिंचन विभाग, जळगांव तालुका आणि जिल्हा जळगांव, गंभीर निवेदनाद्वारे सांगतो की, या उत्तरात दिलेल्या प्रतिज्ञापत्रातील अ. क्र. ११ मुद्दा क्र. ३ ची माहिती, माझ्या माहिती प्रमाणे खरी आणि बरोबर आहे.

म्हणून २७ नोव्हेंबर, २०१५ या दिवशी जळगांव येथे पडताळणी करण्यात आली.

पदाधिकाऱ्याला ओळखले

पदाधिकारी

कार्यकारी अभियंता
गिरणा सिंचन विभाग
जळगांव

NOTARY
STAMP

**प्रतिज्ञापत्र**

माझ्यासमोर गंभीरपणे पुष्टी दिली. श्री. संभाजी जगन्नाथ माने ज्यांना ॲडव्होकेट वी. ई. पाटील आणि श्री. यु. एन कोळंबे यांनी ओळख पटविली आणि ज्यांना मी वैयक्तिकरित्या ओळखतो.

**माझ्या समोर**
**ॲड. हेमंत एच. मुदलियार**
**नोटरी - गव्हर्नमेंट ऑफ इंडिया**
बेसमेंट, जेटी चेंबर्स, एचडीएफसी एटीएम
जिल्हा न्यायालयासमोर, जळगांव-४२५००१ (महाराष्ट्र राज्य).
दूरध्वनी क्र. (ऑफिस) : २२३५८२५, निवास : २२५५०००
(मोबाइल : ९८२३०७३२००)

NOTARY
STAMP

NOTARY
STAMP

NOTARY

<u>२०१५ चे प्रकरण क्र. ८</u>

**गिरणा उप-खोऱ्यातील प्रवाहाविरुद्ध धरणांमधून गिरणा जलाशयात पाणी सोडण्याच्या बाबतीत**

श्री. उन्मेष पाटील, विधानसभा सदस्य, चाळीसगांव .......... **याचिकाकर्ता**

**विरुद्ध**

सचिव (जलसंपत्ती व्यवस्थापन आणि अधिकार क्षेत्र विकास),
मंत्रालय, मुंबई - ४०००३२. .......... **प्रतिवादी**

NOTARY STAMP

NOTARY STAMP

NOTARY STAMP